नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 19/08/2021 (गुरूवार)
(सकाळ)

---

## चोरी

1) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावरील मौजा मेंढेपठार येथे दिनांक 17/08/2021 चे 12.00 वा. चे 20.30 वा. सुमारास फिर्यादी नामे– मोहम्मद जाकीर अन्सारी, वय 40 वर्ष, रा. मेंढेपठार हे आपले टायर पंचर दुरूस्तीचे दुकानाला कुलुप लावुन बंद करून काटोल येथे गेले होते. फिर्यादी हे कामानिमीत्य नागपुर येथे निघुन गेले. रात्री 20.30 वाजता नागपूर वरून परत आल्यानंतर दुकानाजवळ जावुन पाहिले असता दुकानाचा दरवाजा खुला असुन दरवाज्याची कडी तुटलेली दिसली व कुलुप खाली पडलेला दिसला. फिर्यादीने दुकानाच्या आतमध्ये जावुन पाहणी केली असता दुकानातील नविन टायर टि.व्ही.एस. कंपनीचे मोटार सायकलचे 10 टायर कि. 20,000/–रू. व 15 बाईकचे रिमोल्ट टायर कि. 4,500/–रू. असा एकुण कि. 24,500/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 461, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक सुनिल ठोंबरे मो. क्र 9011026414 हे करीत आहे.

3) पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 04 कि. मी. मौजा टाकळघाट येथे दिनांक 04/08/2021 ते दिनांक 05/08/2021 चे 12.00 वा. सुमारास फिर्यादी नामे– सौ. प्रिती आशिष तितरे, वय 29 वर्ष, रा. सिल्लेझरी त. नागभिड, जि. चंद्रपूर ह.मु. टाकळघाट त. हिंगणा जि. नागपुर यांनी घरामध्ये बॅगमध्ये ठेवलेले सोन्याचे मंगळसुत्र कि. 40,000/–रू. यातील संशईत महिला आरोपी नामे– सौ प्रिती गुळभेले, वय 25 वर्ष, रा. टाकळघाट त. हिंगणा जि. नागपुर हिने चोरून नेवून सदरचे मंगळसूत्र बांगरे ज्वेलर्स टाकळघाट येथे तारण ठेवला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

## मोटरसायकल चोरी

1) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत मौजा किल्लेकोलार अर्धनारी नटेश्वर मंदीराजवळ येथे दिनांक 17/08/2021 चे 10.00 वा. सुमारास फिर्यादी नामे– कृष्णा नामदेव शेन्डे, वय 50 वर्ष, रा. कोराडी मच्छी हे शंकरजी च्या मंदिरात चे समोर गेट समोर गाडी लावुन पाणी पिण्याकरिता गेले होते. त्यादरम्यान त्यांची एमएच– 40/बीव्ही– 3023 क्रमांकाची हिरो होंडा शाईन कंपनीची काळया रंगाची मोटरसायकल किंमती 40,000/–रू. अज्ञात आरोपीने चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा उमेश ठाकरे मो. नं. 9822764999 हे करीत आहे.

2) पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 01 कि. मी. अंतरावरील नरखेड येथे दिनांक 17/08/2021 चे 12.30 ते 14.30 वा. सुमारास फिर्यादी नामे– निळकंठ संतोशराव चौरे, वय 55 वर्ष, रा. जलालखेडा, नरखेड हे मजुरांचे मस्टर घेवुन पंचायत समिती नरखेड येथे आपल्या एमएच– 40/एएस– 6895 क्रमांकाच्या हिरो स्प्लेंडर प्रो मोटरसायकलने गेले होते. त्यांनी त्यांची मोटरसायकल पंचायत समिती नरखेड येथे ठेवली होती. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींची कि. 20,000/–रु. ची मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा मनोज महादेव गाढवे मो. नं. 8805405107 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर